# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-02.09.2026** **वार- बुधवार**

---

**आवाज मर्यादा**

पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीत साऊंड सिस्टीमसाठी चार बेस आणि चार टॉपची मर्यादा निश्चित करण्याबाबत जवळपास एकमत झालं आहे. यापेक्षा अधिक ध्वनीपातळी असलेल्या ध्वनीक्षेपक उपकरणांचा वापर केल्यास संबंधित गणेश मंडळाविरुद्ध गुन्हा दाखल करून नियमबाह्य साऊंड सिस्टीम जप्त केली जाईल, असा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. प्रेशर मीड आणि प्लाझ्मा उपकरणांच्या वापरावरही पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. गणेश मंडळांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. मिरवणूक सुरू झाल्यानंतर अतिरिक्त बेस किंवा टॉप जोडल्यासही कारवाई केली जाणार आहे. ध्वनिप्रदूषण प्रतिबंधासाठीच्या नियमांची कडक अंमलबजावणी केली जाणार असल्याचंही पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.

**ई-बाईकटॅक्सी**

पुण्यात ई-बाईक टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी उबर आणि रॅपिडोसह अॅप-आधारित वाहतूक कंपन्यांनी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय म्हणजेच आरटीओकडे परवानगीसाठी अर्ज केले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अॅग्रीगेटर धोरणानुसार या कंपन्यांना सेवा सुरू करण्यासाठीचा परवाना घेणे बंधनकारक आहे. आरटीओकडून या अर्जांची सविस्तर छाननी केली जाणार असून,वाहनांची कागदपत्रं, विमा यांसह प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजनांची तपासणी केली जाणार आहे.

**खड्डेमुक्त**

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहरातील खड्डे बुजविण्यास गती देण्यात येत असल्याचं म्हटलं असून गणेशोत्सवापूर्वी शहर खड्डेमुक्त करण्याची ग्वाही दिली आहे. शहरातील २३ शे पेक्षा जास्त खड्डे बुजवण्यात आले असून उर्वरित ५१८ खड्डे लवकरच बुजवले जातील. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन हौद, स्वच्छता आणि विजेच्या तारांची सुरक्षा तपासण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. तसंच, शहरातील नवीन अनधिकृत बांधकामांचं पाणी आणि वीज जोडणी तातडीने खंडित करण्याचे आदेशही आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले.

**एमपीएससी मागणी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, गोपनीयता आणि उत्तरदायित्व आणण्याची मागणी स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी आणि शिक्षकांनी केली आहे. यासंदर्भात काल घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत प्रशासनाकडे अठरा कलमी मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आलं असल्याची माहिती देण्यात आली. प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी , परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकार,

प्रश्नपत्रिकेतील त्रुटी आणि परीक्षा केंद्रांवरील अडचणींबाबत स्वतंत्र ऑनलाइन तक्रार निवारण यंत्रणा उभारण्याची तसच ‘परीक्षा सुधारणा समिती’ स्थापन करून कायमस्वरूपी मार्गदर्शक आराखडा तयार करण्याची मागणीही शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी केली आहे.

**उद्योगतक्रार निवारण**

पुणे जिल्ह्यातील उद्योजकांच्या विविध शासकीय, प्रशासकीय समस्या, तक्रारी तसंच प्रलंबित प्रकरणांचे तातडीनं आणि कालबद्ध पद्धतीने निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योग तक्रार निवारण कक्ष आणि मैत्री सेल कार्यान्वित करण्यात आला आहे. उद्योजकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध शासकीय विभागांकडे प्रलंबित असलेल्या उद्योजकांच्या तक्रारी आणि समस्यांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. सध्या एकंदर १३४ तक्रारी प्रलंबित आहेत.

**प्राणीक्लेश सूचना**
पुणे जिल्ह्यात प्राणी क्लेश रोखण्यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी नियोजन करण्याची सूचना पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी संबंधित विभागांना केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची बैठक झाली. त्या बैठकीत डूडी यांनी ही सूचना केली. भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार आश्रय, खाद्य, निर्बिजीकरण आणि वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

**पाऊसतूट**
यंदाच्या पावसाळ्यात पुणे जिल्ह्याच्या काही भागांत समाधानकारक पाऊस झाला असला, तरी ऑगस्ट महिन्यात जिल्ह्याच्या पावसाच्या सरासरीत मोठी तूट नोंदविण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ६५ पूर्णांक ८ टक्के पाऊस झाला आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागात अपेक्षित पाऊस न झाल्यानं शेतीवर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. पुढील आठवड्यात समाधानकारक पाऊस न झाल्यास त्याचा परिणाम खरीप पिकाच्या उत्पादनावर होण्याची शक्यता जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली आहे.

**आयएचएच स्काय रेस**

पुण्याच्या अपर्णा उपाध्याय या ४३ वर्षीय महिलेने मलेशियातील क्वालालंपूरच्या मर्डेका ११८ टॉवरमधील 'आय एच एच स्काय रेस' यशस्वीपणे पूर्ण केली. या टॉवरमधील ११८ मजल्यांच्या २ हजार ८४५ पायऱ्या त्यांनी ४८ मिनिटे ३६ पूर्णांक ३२७ सेकंदांत चढल्या. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या उंच इमारतीत झालेल्या या शर्यतीत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या एकमेव भारतीय महिला ठरल्या आहेत. अपर्णा यांनी २० ऑगस्टला सिंगापूरमधील ३९ मजली फ्रेझर टॉवरची पायऱ्यांची शर्यत सलग तिसऱ्यांदा पूर्ण केली. तैपेई १०१, पिंग आन इंटरनॅशनल फायनान्शियल सेंटर आणि मलेशियातील केएफ टॉवर यांसारख्या गगनचुंबी इमारतींच्या शर्यतीही त्यांनी पूर्ण केल्या आहेत.

**हवामान**
पुणे शहर आणि परिसरात आज कमाल २९ तर किमान २० पूर्णांक ९ दशांअंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. काही भागात आकाश अंशतः ढगाळ होतं, तसंच पावसाच्या हलक्या सरीही पडल्या. उद्याही हवामान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**